Exh. 8/B

कि. दिवाणी अर्ज न. नं. ७४/२०२६

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिशसो, कोल्हापूर,

यांचे कोर्टात ....

| | |
|---|---|
| सौ.सृष्टी प्रशांत डोईफोडे .... | अर्जदार |

Order
Seen & filed

PDJ, Kolhapur
7-5-26

विरुध्द

| | |
|---|---|
| श्री प्रशांत प्रकाश डोईफोडे .... | वि.प. |

**यातील वि.प.तर्फे अर्जदार यांचे अर्जास म्हणणे खालील प्रमाणे.**

१. यातील अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज व त्यातील कथने ही साफ खोटी व चुकीची असून ती यातील अर्जदार हिला वि.प. यांचे विरुध्द सदरचा अर्ज दाखल करणेस कोणतेही कारण घडलेले नाही. कारण घडले बाबत लिहीलेला मजकूर साफ खोटा व चुकीचा आहे याही कारणाचा विचार होवून अर्जदार यांचा सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

२. यातील अर्जदार हिला यातील वि.प. अगर त्यांचे घरचे लोकांनी केंव्हाही कोणत्याही प्रकारचा त्रास दिलेला नव्हता व नाही. यातील अर्जदार हीच स्वत: वि.प.यांचा त्याग करुन तिचे माहेरी रहात होती. सदर वेळी देखील यातील वि.प.यांनी अर्जदार हिचा पती म्हणून चांगला सांभाळ केलेला आहे. यातील अर्जदार यांनी त्यांचे अर्जात नमुद केलेली सर्व कथने साफ खोटी व चुकीची आहेत.

6/5/26

३. यातील अर्जदार व वि.प. हे पती पत्नी असून यातील अर्जदार हिला वि.प.यांचे पासून कु.स्पंदन हा मुलगा झाला आहे. इतकाच मजकूर खरा व बरोबर आहे. इतर सर्व कथने साफ खोटी व चुकीची आहेत. यातील अर्जदार या लग्नापुर्वी कोणतीही नोकरी करत करत नव्हते. यातील अर्जदार हिची शासकीय नोकरी प्राप्त करणेची तिव्र इच्छा असलेने यातील वि.प. व त्यांचे घरचे लोकांनी स्वत: यातील अर्जदार हिला आवश्यक ती सर्व आभ्यासाकरीता लागणारी पुस्तके, ऑनलाईन क्लासेस, अन्य माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

४. यातील अर्जदार ही सध्या शासकीय नोकरीत असलेने यातील अर्जदार ही तिचे माहेरी गारगोटी ता.भुदरगड, जि.कोल्हापूर येथे रहाणेस नाही. असे असतांना यातील अर्जदार ही नोकरीचे ठिकाणचा कोणताही पत्ता अगर पद या अर्जाचे कामी नमुद केलेला नाही. यावरुन यातील अर्जदार ही केवळ वि.प. व त्यांचे घरचे लोकांचेवर खोटे आरोप करुन बदनाम करणेचा तसेच यातील वि.प. यांनी तिचे माहेरी गारगोटी येथे अगर यातील अर्जदार ही नोकरी करत असलेल्या ठिकाणी येवून रहावे या करीता दबाव निर्माण करणेच्या उद्देशाने सुरुवातीस यातील अर्जदार हिने वि.प. यांचे विरुध्द मे कोर्ट मजकूरी एच.एम.पी.नं. ३५/२०२५ चा अर्ज दाखल केलेला आहे.

५. यातील वि.प.हे अर्जदार हिला नांदविणेस केंव्हाही नकार दिलेला नव्हता व नाही. केवळ यातील वि.प. हे त्याचे घरचे लोकांचे पासून अर्जदार हिचे बरोबर विभक्त रहात नाहीत या कारणांवरुन खोटी कथने नमुद करुन यातील वि.प. यांचे विरुध्द एच.एम.पी.नं. ३५/२०२५ चा अर्ज दाखल केले नंतर देखील यातील वि.प.यांनी अर्जदार हिला स्वत: तसेच

मध्यस्थ लोकांचे मार्फत तसेच समाजातील प्रतिष्ठीत लोक श्री संभाजी खोचरे, श्री कुंभार, श्री तिक्के, श्री कोरवी, व सुरेखा डोईफोडे, महेंद्र कोळी सर यांचे मार्फत व घरचे लोकांचे मार्फत यातील अर्जदार हिला नांदणेस आणणेचा प्रयत्न करुन देखील यश न आलेने यातील वि.प. यांनी अर्जदार ही नांदणेस येणेबाबत मे सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन इचलकरंजी यांचे कोर्टात एच.एम.पी.नं. ३६०/२०२५ चा अर्ज दाखल केला आहे.

६. यातील अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज व त्यातील कथने यातील वि.प.यांना मान्य अगर कबुल नाहीत. यातील अर्जदार यांनी मे. सिनिअर डिव्हीजन,- कोल्हापूर येथे दाखल केलेल्या अर्जाचे कामी यातील अर्जदार व वि.प.यांचेमध्ये आपसात तडजोड व्हावी म्हणून एच.एम.पी. नं. ३५/२०२५ चे नेमले प्रत्येक तारखेस मे कोर्ट मजकूरी हजर रहात आहेत.

७. यातील वि.प.यांनी अर्जदार हिचा केंव्हाही स्वत:हुन त्याग केलेला नाही. उलट यातील अर्जदार हिच वि.प. यांचा त्याग करुन यातील वि.प. यांचेकडे नांदणेस येणेस नकार दिलेला आहे.तसेच यातील अर्जदार व वि.प.यांचा मुलगा कु.स्पंदन याची वि.प.यांना व त्यांचे घरचे लोकांना भेट देणेपासून टाळाटाळ करुन कु.स्पंदन यास भेटणेस आलेस तुमचेवर खोटया तक्रारी नोंद करुन तुम्हाला पोलिस कोठडीत पाठविन अशी धमकी यातील अर्जदार हिने स्वत: वि.प.यांना दिलेली आहे.

८. यातील अर्जदार हिची आई ही शिक्षीका असून अर्जदार हिचे वडिल हे मुख्याध्यापक पदावरुन सेवानिवृत्त झालेले आहेत. यातील अर्जदार यांनी सदर अर्जाचे कामी कोणताही कागदोपत्री पुरावा हजर न करता यातील

वि.प.यांचे भरमसाठ उत्पन्न असलेचे नमुद केले आहे. त्याचे पृष्ठयार्थ कोणताही पुरावा सादर केलेला नाही. सध्या यातील अर्जदार ही नोकरीस असलेने कु.स्पंदन याच्या देखभालीकडे पूर्ण दुर्लक्ष होत आहे.

९. यातील अर्जदार यांनी दाखल केलेला सदरचा अर्ज मंजूर झालेस यातील वि.प.यांनी मे.सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन, इचलकरंजी येथील नांदणेस येणेबाबतचा अर्ज देखील एकत्रित चालणार आहे. याही कारणाचा विचार होवून यातील अर्जदार यांनी दाखल केलेला एच.एम.पी.नं. ३५/२०२५ व एच.एम.पी.नं. ३६०/२०२५ हे दोन्ही अर्ज एकाच न्यायालयामध्ये एकत्रित चालणे बाबत लिहीलेला मजकूर साफ खोटा व चुकीचा आहे. यातील अर्जदार यांना वि.प. यांचे सोबत एकत्रित संसार करणेची सुरुवातीपासूनच इच्छा नव्हती व नाही.

१०. यातील अर्जदार यांनी सदर अर्जाचे कामी वि.प. विरुध्द खोटे आरोप करुन सदरचा अर्ज दाखल केला आहे. यातील वि.प. हे स्वत: अर्जदार हिला शासकीय नोकरी प्राप्त व्हावी या करीता म्हणून यातील वि.प. हे करत असलेले मुंबई येथील नोकरी सोडणेस यातील अर्जदार हिने भाग पाडले केवळ अर्जदार हिचेवर असलेल्या प्रेमाखातीर यातील अर्जदार हिला शासकीय नोकरी मिळावी या करीता यातील वि.प.यांनी स्वत: बराच प्रयत्न केलेला आहे.

११. यातील अर्जदार हिला सध्या शासकीय नोकरी प्राप्त झाली असलेने तसेच यातील वि.प.यांना सध्या कोणतीही नोकरी नसलेने यातील अर्जदार ही वि.प.यांचेवर वेगवेगळे आरोप करुन यातील वि.प. यांनी अर्जदार हिला संमत्तीने घटस्फोट देणेस सहया द्याव्यात अगर तिचे मर्जी प्रमाणे इच्छेप्रमाणे वयोवृध्द आई वडिलांना सोडून विभक्त असे अर्जदार

6/3/26

Supdt. District Court ... ji.

हिचे माहेरी गारगोटी अगर अर्जदार ही नोकरी करत असलेल्या ठिकाणी येवून रहावे याकरीता यातील अर्जदार हिने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

१२. यातील वि.प.यांनी अर्जदार हिला नांदविणेस केंव्हाही नकार दिलेला नव्हता अगर नाही. आजदेखील यातील वि.प. हे अर्जदार हिला पती पत्नी या पवित्र नात्याने एकत्रित नांदविणेस तयार आहेत. याही कारणाचा विचार होवून अर्जदार यांचा सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

१३. यातील अर्जदार हिने दाखल केलेला सदरचा अर्ज मंजूर झालेस यातील वि.प. यांचे आर्थिक व मानसीक फार मोठे नुकसान होणार आहे. सध्या यातील वि.प. हे सुशिक्षीत इसम असून त्यांना कोणतेही कायम स्वरुपी नोकरी नाही. यातील वि.प. हे मिळेल ती छोटी मोठी कामे करुन सदरचा उधरनिर्वाह करत असून अर्जदार ही शासकीय नोकरीत असून तिला भरमसाठ पगार आहे. तसेच यातील अर्जदार हिचे माहेरची परिस्थिती देखील अत्यंत गर्भ श्रींमंतीची आहे. याही कारणाचा विचारहोवून अर्जदार हिचा सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

येणेप्रमाणे असे

मे. जा. व्हावे,

दिनांक ०६/०५/२०२६.

-----------------

6/5/26

Superintendent,
District Court, Ichalkaranji

## प्रतिज्ञा

मी यातील वि.प. **श्री प्रशांत प्रकाश डोईफोडे,** व.व. ३५, धंदा- मजूरी काम, रा. स्वामी अपार्टमेंट जवळ, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर आजरोजी इचलकरंजी मुक्कामी अशी प्रतिज्ञा करतो की, वरील नमुद म्हणणे मधील लिहीलेला सर्व मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा सही तारीख ०६/०५/२०२६.

-----------------

## ॲफिडेव्हीट

मी यातील वि.प. **श्री प्रशांत प्रकाश डोईफोडे,** व.व. ३५, धंदा- मजूरी काम, रा. स्वामी अपार्टमेंट जवळ, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर आजरोजी इचलकरंजी मुक्कामी सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट लिहून देतो की,

मी यातील वि.प. आहे. यातील अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जास मी माझे म्हणणे आजरोजी या कामी दाखल करीत आहे. सदर म्हणणे मधील लिहीलेला सर्व मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून लिहून दिले सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट सही तारीख ०६/०५/२०२६.

ॲफिडेव्हीट करणार यास मी

ओळखतो. -----------------

ॲडव्होकेट

प्रशांत प्रकाश डोईफोडे

## प्रतिज्ञा

मी यातील वि.प. **श्री प्रशांत प्रकाश डोईफोडे,** व.व. ३५, धंदा-मजूरी काम, रा. स्वामी अपार्टमेंट जवळ, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर आजरोजी इचलकरंजी मुक्कामी अशी प्रतिज्ञा करतो की, वरील नमुद ॲफिडेव्हीट मधील लिहीलेला सर्व मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा सही तारीख ०६/०५/२०२६.

-----------------

Solemnly affirmed before me
by Prashant Prakash Doifode
who is identified by Adv.
M.V. Jamkhandi Adv
to whom I personally know

Dt. 6/5/2026

Superintendent
District Court, Ichalkaranji